# महात्मा गांधी आणि रामराज्य संकल्पना

**कु. रोहिणी कुभार,** संशोधक विध्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**प्रस्तावना :**

महात्मा गांधीकडे असामान्य नेतृत्व गुण होते. ते खऱ्या अर्थाने भारताचे जननायक ठरले. त्यांच्या आचार, विचार व कृतीत थोडीही विसंगती नव्हती. त्यामूळे त्यांच्या प्रत्येक विचारात मानवी नीतीमूल्य, मानवतेचा धर्म, सत्य, अहिंसा, दया, प्रेम अशा असंख्य तत्वांचा मिलाप गांधीजींच्या केवळ विचारातच नव्हता तर तो प्रत्यक्ष कृत्तीत होता. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीयांना स्वराज्य कसे प्राप्त होईल याचा विचार त्यांनी प्रथम केला. स्वराज्या बरोबर सुराज्य असले पाहिजे अशी त्यांची ठाम भूमिका होती. त्यांनी आपल्या राजकीय विचारांर्तगत रामराज्यची संकल्पना महत्वाची असून यातून सुराज्य येईल असे त्यांचे मत होते.

**उद्देश :** १.राजकीय विचारात रामराज्य संकल्पनेचा अभ्यास करणे

२.रामराज्यातून सुराज्याची स्थापनेचा अभ्यास करणे.

**विषय विवेचन :**

गांधीजींनी शेवटच्याश्वासापर्यंत गांधीजींनी रामनामाचा जप करतांना प्राण सोडला. पूर्ण आयुष्यभर महात्मा गांधींनी आत्मबल आणि आत्मशुध्दीच्या आधारे कार्य केले. त्यांनी राम आणि धर्माशी संबधीत विचारधारेपेक्षा अधिक ते मानवतावादी होते. गांधीजींच्या रामावर हिंदू धर्माचा एकाधिकार नव्हता तर त्यांचा राम हिंदू, मुस्लिम, शीख, ईसाई या सर्वांचे आहेत. महात्मा गांधीजींची रामराज्याची संकल्पना अगदी वेगळी आहे. रामराज्य म्हणजे आदर्श राज्य, ते राज्य कोणत्याही एका विशीष्ट धर्म अथवा जातीचे राज्य नसून ते नीती व मर्यादेवर आधारीत एक असे राज्य आहे की, अभिव्यक्तीचा अधिकार असला पाहिजे प्रेम आणि सद्भावना या राज्याचा पाया आहे. १९२९ मध्ये 'यंग इंण्डियात' महात्मा गांधींनी स्पष्ट केले की, "राम राज्याचा अर्थ हिंदू राज्य नाही. माझ्या म्हणण्याचा अर्थ ईश्वरीय राज्य भगवानाचे राज्य, माझ्या कल्पनेतील राम या प्रथ्वीवर असतील अथवा नसतील रामराज्याचा प्राचीन आदर्श निःसंदेह एक खरे लोकतंत्र आहे. ज्यात गरिबांतील गरीब नागरीकांना न्याय मिळाला पाहिजे."[१] तसेच या रामराज्याची के.जी. मश्रुवाल यांनी वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे दिली आहेत.

- लोकांमध्ये समान राष्ट्रीयत्वाची तीव्र भावना असली पाहिजे.
- हिंदू, मुस्लिम आणि इतर समुदायांमध्ये शांतता आणि परस्पर विश्वास असावा.
- भारतीयांमध्ये वर्ग, जात आणि भाषेच्या आधारावर वैराची भावना नसावी.
- अन्यायाप्रती अहिंसेच्या तंत्राला प्रोत्साहन दिले पाहिजे
- लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी विकेंद्रीकरणावर भर द्यावा
- उच्च आणि नीच जाती, स्पृश्य आणि अस्पृश्य यांच्यात विभागलेला समाज निर्माण करणे हे आपले ध्येय असले पाहिजे.
- प्रत्येक व्यक्ती निरोगी आणि भरभराटीस येवो.
- रोग, उपासमार आणि बेरोजगारीची अनुपस्थिती सुनिश्चित केली पाहिजे. आपली राष्ट्रीय वाटचाल जागतिक शिक्षणाकडे होऊ दे.

महात्मा गांधीचे रामराज्य म्हणजे राज्यविहीन, वर्गविहीन, जातीविहीन समाज होता. यालाच ते रामराज्य म्हणून संबोधतात. रामराज्य आणायचे असेल तर व ते टिकवायचे असेल तर ते कोणत्याही शक्ती व्दारे शक्य नाही. हे ओळखता आले पाहिजे. "रामराज्य म्हटले की पावन व सर्व हितकारी समाजाच्या अतिउच्च अवस्थेची कल्पना आपल्यासमोर येते. त्याला ते दैविराज्य किंवा सत्ययुग म्हणायला संकोच करत नव्हते हे रामराज्य धर्म्ये असले तरी कोणत्याच विशिष्ट रुढ धर्माच्या चौकटीत मर्यादीत नाही. सर्व धर्म पंथ समानतेच्या भावनेने व आनंदाने विरोध न करता एकत्र नांदू शकतात. या राज्याला भौगोलिक मर्यादाही नाही. मानवता हीच त्याच्या नागरीकत्वाची सर्वात मोठी कसोटी आहे. सर्व मानव जे धर्म, जात, लिंग, भाषा आणि प्रांत या कोणत्याही अधारे भेदभाव करत नाही.

प्रत्येक व्याकतिला राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याचा व बंधू भावाने, समसमान अधिकाराने एकत्र राहू वावरू शकतात, ते सर्वांच्या सेवेसाठी उत्सुक आसतात असे हे नैतिक शक्तीवर आधारलेले सर्व सता आसलेले राज्य आहे.

रामराज्यासाठी आवश्यक अशी शक्ती राष्ट्रात निर्माण करणे, त्यासाठी अविरथ व निःस्वार्थ पणे झटने म्हणजे रामराज्य असेही ते म्हणत. स्वाराज्यापेक्षा ते प्राप्त करण्याच्या अविरत प्रयत्नात अधिक आनंद वाटतो आणि रामराज्यासाठी ही हाच नियम लागू आहे. गांधींच्या विधायक कार्यक्रमाची अपूर्वता यात होती की, त्यामूळे या रामराज्याची खरी आधारशकक्ती राष्ट्रकरण्यात निर्माण होईल. वेगळया अर्थाने ते रामराज्याच्या आदर्शाकडे टाकलेले ते पहिले पाऊल असे म्हणता येईल.[२]

महात्मा गांधीजींनी आदर्शराज्यव्यवस्थेला रामराज्य असा शब्द संबोधित केला आहे. त्यांच्या मता नुसार धार्मिक दृष्टिकोणातून रामराज्याचा अर्थ पृथ्वीवरील ईश्वराचे राज्य असा आहे . महात्मा गांधी असे म्हणतात की, “मी अशा प्रकारे भारत निर्माण करण्याचा प्रयत्न करत राहीन की, गरिबातल्या गरीब व्यक्तिंना असे वाटले पाहिजे की, हा माझा देश आहे. अशा प्रकारची राष्ट्रनिष्ठा मनात निर्माण झाली पाहिजे कि ज्यात उच्च निच्च आसा वर्ग भेद असणार नाही. सर्व जाती धर्माचे लोक परस्पर स्नेह व सद्भावनेने एकत्र राहातील अशा प्रकारच्या सुंदर भारतात अस्पृश्यता, मध्यप्राशन या गोष्टीला स्थान असणार नाही.” अशी जनता स्वतः नैतिक आधारावर अहिंसात्मक अथवा आदर्श राज्याची सविस्तर योजना बनवेल.[३] अशा प्रकारे महात्मा गांधीजींचे रामराज्य किंवा आदर्श राज्य अत्यंत आदर्शकेंद्रीत आहे की ज्या राज्यात कोणत्याही प्रकारच्या अनैतिक, अयोग्य अशा तत्वाला स्थान असणार नाही. गांधीजींनी आपल्या या विचारात समाजातील मानवाशी संबंधीत प्रत्येक गोष्टीचा समावेश केला आहे.

**महात्मा गांधीची रामराज संकल्पनेची प्रासंगिकता :**

महात्मा गांधींच्या रामराज्याच्या संकल्पनेचा स्विकार वर्तमान राजकारणात राजकीय नेतृत्वाने केली तर, बहुतांश मानव समाज समस्यातून मूक्त होईल. महात्मा गांधीजीच्या या विचाराचा अवलंब कांही प्रमाणत जरी केला तर निश्चितपणे मानवी जीवन सुखी व आनंदी बनेल. एकूणच रामराज्यातील प्रत्येक तत्वांची प्रत्यक्ष अमलबजावणी करणे आजच्या परिस्थित ही गरजेचे आहे.

**सारांश :**

गांधीजींनी ज्या आदर्शराज्याची कल्पना केली होती ते आधूनिक कल्याणकारी राज्याचे आदर्शस्वरूप प्रस्तूत करते. त्यांनी आपल्या रामराज्याच्या विचारात सर्वधर्म समभाव, मानवता, बंधूभाव, समानता,स्वातंत्र्य इत्यादी मूल्यांचा पुरस्कार केला आहे. व ही मूल्य वर्तमान काळात आखिल मानव जातीच्या विकास व कल्याणाकरिता महत्वपूर्ण माणली जात आहेत. आज सामाजिक, आर्थिक, राजकीय समस्या प्रत्यक्षात आणण्यात वर्तमानकालीन पाश्चिमात्य धरतीवरील लोकशाही व्यवस्था अयशस्वी ठरली आहे. या उलट सांप्रदायिकता, विषमता, जातीयता, याला प्रोत्साहन दिले जात आहे. हिंसा आणि शोषण ही आजच्या व्यवस्थेची प्रमूख वैशिष्ट्ये आहेत. हे सर्वदोष दोष दूर करण्याकरिता महात्मा गांधीचे रामराज्य विषयक विचार महत्वपूर्ण ठरतात.

**संदर्भ सूची :**

१.रघुनाथ माशेलकर, “अखंड प्रेरणा गांधी विचारांची”, सकाळा प्रकाशन,पुणे,२०११, पृ.२११
२.सुजाता गोडबोले (अनुवाद), “गांधीजीचे असामान्य नेतृत्व”, राजहंस प्रकाशन , पुणे,२०१९, पृ.२२
३.कुंभार नागोराव , “सत्याग्रह -महात्मा गांधीचा का दृष्टीकोण” , वाईट पब्लिकेशन, जयपूरपृ., २०११,पृ.२
४.दिलीप कुलकर्णी, “गांधी उद्यासाठी”,राजहंस प्रकाशन , पुणे,२०१९
५.महाराष्ट्र टाईम आणि सकाळ वृत्तमानपत्र